Sakal, Wednesday, 18th May, 2011, P. 9

# 'मृत्यूनंतरचा स्वर्ग' ही एक परीकथा : हॉकिंग



लंडन, ता. १७ : 'मृत्यूनंतरचा स्वर्ग' ही एक परीकथा आहे. प्रत्यक्षात स्वर्ग अस्तित्वात नाही, असे विधान प्रख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनी केले आहे. 'आपला मेंदू हा एखाद्या संगणकासारखा काम करतो. संगणकातील सुटे भाग खराब झाल्यावर त्याचे काम थांबते व मेंदूचीही तशीच गत होत असते. खराब झालेल्या संगणकाला स्वर्ग मिळत नसतो आणि त्याचप्रमाणे आपल्यालाही! स्वर्ग ही एक परीकथा आहे. अंधाराला घाबरणाऱ्या माणसांना धीर देण्यासाठी ती निर्माण करण्यात आली आहे,' असे हॉकिंग यांनी म्हटले आहे. हॉकिंग (वय ६९) यांना त्यांच्या वयाच्या २१व्या वर्षी मणक्याचा दुर्धर आजार झाला. 'मी जास्त काळ जगू शकणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितल्यानंतरही गेली ४९ वर्षे जिवंत आहे,' असे अभिमानाने नमूद केले आहे.